लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# लातुरात भाज्यांचे दर कडाडले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल :** दिवसेंदिवस वाढणारा उष्मा आणि उन्हाच्या तीव्रतेमुळे सध्या लातूरच्या भाजी मार्केटमध्ये भाज्यांचे दर चांगलेच कडाडल्याचे दिसून येत आहे. काकडी , हिरवी मिरची , टोमॅटोसह सर्व भाज्या सामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर गेल्याचे पाहायला मिळत आहे.

भाजी मार्केटमध्ये परिस्थितीनुरूप बदल नेहमीच अनुभवायला येतो. टोमॅटोचा मौसम सुरु झाला की अक्षरशः पाच दहा रुपये किलोप्रमाणेही टोमॅटोला भाव मिळत नाही. तोच टोमॅटो उन्हाळ्यात अगदी शंभर दीडशे रुपये किलोपर्यंतही पोहोचल्याचे ग्राहकांनी पहिले आहे. लातूरच्या भाजी मार्केटमध्ये आजमितीस काकडी पन्नास ते साठ रुपये किलो, हिरवी मिरची तीस रुपये पाव किलो प्रमाणे विक्री होत आहे. मागणी कमी असल्याने सध्यस्थितीत वांग्याचा भाव मात्र दहा ते पंधरा रुपये पाव किलो असल्याचे दिसून आले. पालेभाज्यांची आवक कमी असल्याने पालेभाज्यांचे दरही मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसत आहे. भाज्यांचे दर वाढल्याने गृहिणींचे किचनची बजेट बऱ्यापैकी बिघडल्याचे दृष्टीपथास येत आहे.



# लातुरातील वाहतूक कोंडीवर शोधला उपाय

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३ मे : लातूर शहरातील वाहतूक कोंडी हा विषय अतिशय क्लिष्ट बनला होता. त्यावर पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी रविवार दि. ३ मे पासून एक जाहीरनामा काढून वाहतुकी कोंडीवर तूर्तास योग्य पर्याय काढल्याचे दृष्टीपथास येत आहे. या पर्यायामुळे काही अंशी का होईना वाहतुकीच्या कोंडीवर मात करणे शक्य झाले आहे.

लातूर शहरातील जवळपास सर्वच रस्त्यावर वाहतुकीची मोठी कोंडी होत असल्याचे सर्व्यांनी अनुभवले आहे. लातुरातील वाहनधारक वाहतुकीचे नियम तोडण्याकामीही अव्वल असल्याचे सर्वज्ञात आहे. सकाळच्या तसेच सायंकाळच्या वेळेत शहरातील मुख्य रस्त्यांसह छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजीव गांधी चौक, महात्मा बसवेश्र्वर चौक अशा प्रमुख चौकात चांगलीच वाहतुकीची कोंडी व्हायची. अक्षरशः एक वाहन जर लाईन सोडून मध्ये घुसले की तीनतीन - चारचार किलोमीटरपर्यंत वाहतुकीची कोंडी होत असे. त्यामुळे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी या वाहतूक कोंडीवर तात्पुरता उपाय शोधला असून त्यांच्या उपाय योजनेनुसार दि. ३ मे २०२६ पासून गांधी चौकाकडून शिवाजी चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर मोटारसायकल वगळता अन्य वाहनांना भुयारी मार्गालगतचा रस्ता शिवाजी चौक वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. गांधी चौकातून बार्शी रोडने शहराबाहेर जाणारी सर्व मोठी वाहने व एसटी बसेस मिनी मार्केट व अशोक हॉटेल येथून पॅरलल रोडने किंवा तहसील कार्यालयासमोरील उड्डाणपुलावरून औसा रोडकडे जातील. उड्डाणपूल संपल्यानंतर पूरणमल लाहोटी अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरून यु टर्न घेऊन परत शिवाजी चौकात येऊन बार्शी रोडकडे जातील. गांधी चौकातून अंबाजोगाई रोडने शहराबाहेर जाणारी सर्व वाहने शिवाजी चौकात न जाता भुयारी मार्गाने बार्शी रोडकडे जातील व जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोरून यु टर्न घेऊन अंबाजोगाई रोडकडे जातील. पीव्हीआर चौकातून गंज गोलाईकडे येणारी सर्व वाहने शिवाजी चौकातील भुयारी मार्गाचा वापर करतील,असे पोलीस अधीक्षकांनी प्रसिद्धीस दिलेल्या जाहीरनाम्यात नमूद केले आहे.

# आयएमए लातूरने दिली कष्टकऱ्यांना सावली, उन्हापासून संरक्षणासाठी विविध वस्तुंचे मोफत वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** कडाक्याच्या उन्हातही पोटासाठी राबणाऱ्या कष्टकऱ्यांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी महाराष्ट्र दिनी इंडीयन मेडीकल असोसिएशन लातूर शाखेच्या वतीने कष्टकऱ्यांना छत्र्या टोप्या, पाणी बॉटल्स, ओआरएस पाकिटे, छोटे पंखे, स्टॉल अंबरेलाज आदींचे मोफत वाटप करण्यात आले. आहे. यावेळी डॉक्टरांनी त्यांना उन्हापासून आरोग्याची काळजी कशी घ्यावी ? याबाबत माहिती सांगितली.याशिवाय शहर वाहतुक सुरळीत करण्यासाठी योगदान देणाऱ्या ट्रॅफिक पोलिसांनाही टोप्या, पाण्याच्या बॉटल्स देण्यात आल्या. त्या स्विकारताना कष्टकऱ्यांच्या चेहर्यावर कृतज्ञतेचा भाव दाटून आला होता.




गंजगोलाई येथे आयएमए लातुरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत , डॉ. शुभांगी राऊत, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. चेतन सारडा, डॉ. अब्दुल हमीद चौधरी, डॉ. संजय पाटील, डॉ. संजय वडार, डॉ. अनिल राठी, डॉ. स्नेहल देशमुख, डॉ. मेघा गुगले यांनी वस्तुंचे वाटप केले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे डॉ. आकांक्षा अवस्थी व डॉ. वेदांत ,डॉ. अभय कदम, डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. विश्र्वास कुलकर्णी, डॉ. वैशाली दाताळ, डॉ. राजकुमार दाताळ, डॉ. सुभाष गोरे, डॉ. राखी सारडा, डॉ. अमित उटीकर, डॉ. राजेश शाह, डॉ. सुमीत वाघमारे, डॉ. राजश्री सावंत, डॉ. दीपक गुगळे राजीव गांधी चौक येथे डॉ. इंदिरा पाटील, डॉ. सुमित पाटील ,डॉ. किरण डावळे, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. सूर्यकांत निसाळे, डॉ. अजय जाधव, डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. आनंद कलमे, डॉ. रचना जाजू, डॉ. शैला सोमाणी, डॉ. शिरीष पाटील, डॉ. अयाज शेख, डॉ. स्नेहल देशमुख, मेघा कोटलवार, चंद्रज्योती बांदखडके यांनी रेणापूर नाका येथे आयएमए लातूरचे सचिव डॉ. विश्रांत भारती व डॉ. मन्सूर भोसगे, , डॉ. रवींद्र इरपतगिरे, डॉ. संदीप कवठाळे, डॉ. राजेश एनाडले, डॉ. अनघा राजपूत, डॉ. अशोक अरडवाड, डॉ. आरती झंवर, डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. चाँद पटेल, डॉ. धनंजय पडवळ, डॉ. विमल डोळे, डॉ. प्रशांत कापसे यांनी तर कणेरी चौक येथे महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. श्र्वेता काटकर पवार, गणेश पवार, डॉ. महादेव बन्सोडे, डॉ. गिरीश कोरे, डॉ. किरण गोजमगुंडे, डॉ. संतोष डोपे, डॉ. सुरेखा काळे, डॉ. उमेश कानडे, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. मुकुंद भिसे, डॉ. सुरेखा निलंगेकर, डॉ. विकास साळुंके, डॉ. मंगेश सेलुकर, डॉ. राहुल सुळ, डॉ. दीपक दाडगे, डॉ. हनुमंत किनीकर यांनी कष्टकर्यांना वस्तुंचे वाटप केले.

# केंब्रिज महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत उज्वल यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे बोर्डाकडून इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल शनिवार, दिनांक २ मे २०२६ रोजी दुपारी १२ वा. ऑनलाईन जाहीर करण्यात आला. सदरील निकालामध्ये अमरदीप बहुउद्देशीय सेवाभावी संस्था लातूर द्वारा संचलित केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाच्या २२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे.




सदरील निकालामध्ये हासबे आदित्य दयानंद या विद्यार्थ्याने ८३.६१% गुण घेऊन कॉलेजमधून सर्वप्रथम, अभय सतीश मारकोळे ८३.३३% गुण घेऊन सर्व द्वितीय तर यरमे निखिल सतीश या विद्यार्थ्याने ८१.५०% गुण घेऊन तृतीय आला आहे.

तसेच कवडे प्रद्युम्न ८१.१७%, जाधव आदित्य ८१.१७%, सांजेकर हर्षल ८०.५०%, हारडे वैष्णवी ७७.६७%, दूधभाते आदिती ७७.६७%, अजमेरा श्रीनिवास ७७.१७%, पाठक श्रुती ७७%, भुतेवाढ श्रीसंत ७६.८३% गुण घेवून उत्तीर्ण झाले. सदरील निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे यावर्षी बारावी बोर्ड परीक्षा इन कॅमेरा घेण्यात आलेल्या होत्या तरीसुद्धा विद्यार्थ्यांच्या आर्थक परिश्रमातून सदरील यश संपादन केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयामध्ये एकूण ७५ विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षा दिली होती. त्यापैकी २२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले तर ४५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

महाविद्यालयाच्या या उज्वल यशाबद्दल प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन संस्थेचे संस्थापक सचिव प्रा. सतीश मारकोळे पाटील, उपाध्यक्ष भारत बुक्तर, फिनिक्स प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या अंजना गुजराती, वीर बाजीप्रभू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मारुती बिरादार, प्रा.शैलजा नीटुरे, प्रा.शितल नल्ले देशमुख, प्रा.सरिता चौधरी, प्रा. भागवत धुळगंडे, प्रा. भारत आघाव, प्रा. संजय पाटील, प्रा. साळुंके, केंब्रिज कॉलेजच्या क्लार्क अर्चना गायकवाड व अनिता स्वामी यांनी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# नियमित पाणीपुरवठ्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर **दि. ३ मे** : आता उन्हाळा चांगलाच कडक जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. अशावेळी शहराच्या सर्वच भागात नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा,अशी मागणी वाढीस लागली आहे.

लातूरकरांना आठवड्यातून केवळ एकदाच पाणीपुरवठा केला जातो. धरणात मुबलक पाणीसाठा असतानाही कधीच नियमित पाणीपुरवठा झालेला नाही. याला नियोजनाचा अभाव हे मूळ कारण आहे. दरवर्षी उन्हाळ्यात शहरातील पाणीटंचाईच्या झळा चांगल्याच जाणवतात. त्यामुळे मनपा प्रशासनाने नियमित पाणीपुरवठा करावा अशी मागणी होत आहे.

# अभिनेते रितेश देशमुख यांच्या अभिवादन रॅलीला मोठा प्रतिसाद





**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** लातूर : 'राजा शिवाजी' चित्रपटाचे निमति, लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते रितेश विलासराव देशमुख यांनी दि. २ मे रोजी सायंकाळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात येऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौका ते पीव्हीआर चौकापर्यंत दुचाकी रॅली काढण्यात आली. यादरम्यान जागोजागी रितेशदादांचे लातूरकरांनी स्वागत करुन प्रचंड प्रतिसाद दिला. अभिनेते रितेश देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या अभिवादन केले. त्यावेळी 'जय जय जय जय जय भवानी जय शिवाजी', 'तुमचं आमचं नातं काय, जय भवानी, जय शिवराय', 'जय जिजाऊ, जय शिवराय', 'हर हर महादेव...', अशा घोषणांनी सा रा आसमंत दुमदुमून गेला. त्यानंतर रितेशदादांनी सर्वांचे आभार माणुन दुचाकी रॅलीला प्रारंभ झाला. दयानंद गेट, संविधान चौक, रिलायन्स पेट्रोल पंप, एमआयडीसी कॉर्नर आणि पीव्हीआर चौकात रितेशदादांचे मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले. यावेळी तरुणांमध्ये प्रचंड उत्साह होता,

# सातकर्णी महाविहारात १० फूट बुध्द मूर्तीची स्थापना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** तालुक्यातील रामेगाव शिवारातील सातकर्णी नगर येथील धम्म संस्कार केंद्रातील महाविहारात वैशाख पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी दहा फूट उंच बुध्दमूर्तीचे अनावरण करण्यात आले. यानिमित्त शुक्रवारी (दि.१) सकाळच्या सुमारास लातूर येथील डॉ. आंबेडकर चौकात धम्म ध्वजारोहण करण्यात आले. बुध्दमूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ. उपगुप्त महाथेरो होते. यावेळी माजी मंत्री आ. संजय बनसोडे, महापौर जयश्री सोनकांबळे, अभिनेत्री प्रियंका उबाळे, प्रा. रामेश्र्वर बद्दर, डॉ. सुधाकर गुळवे, ॲड. मल्लिकार्जुन करडखेलकर, भालचंद्र सोनकांबळे उपस्थित होते.

तथागत गौतम बुध्द हे भारताचे सर्वोत्तम भूमीपुत्र आहेत. त्यांच्या मानवतेची शिकवण अतुलनीय आहे. मानवता, करुणा, शांती आणि बंधुभाव ही तत्वे लोक कल्याणाची आहेत. प्रत्येकाने त्यांच्या नैतिक शिकवणीचे आचरण करावे, ही बुध्द मूर्ती करुणा, शांती, मैत्रीची प्रेरणा देत राहील, असे मार्गदर्शन भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. देवदत्त सावंत यांनी केले.

# पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात ६९ रुग्णांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** महाराष्ट्र दिन तसेच महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन, लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशन,आयएमए लातूर व पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या संयुक्त विद्यमाने येथील पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात ६९ रुग्णांची तपासणी - उपचार करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांसाठी खोरी गल्ली परिसरातील विरंगुळा केंद्रात कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले होते.




पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित शिबिराचे उदघाटन पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती , लातूर ऑर्थोपेडिक असो.चे अध्यक्ष डॉ. गिरीश कोरे, सचिव डॉ. मन्सूर भोसगे, डॉ. चेतन सारडा, डॉ. द्वारकादास तापडिया, डॉ. इम्रान कुरेशी, श्याम धूत, प्रसाद उदगीरकर, पस्तापुरे , विजय रांदड, जितू बजाज, रामेश्र्वर सोमाणी, संजीव भार्गव आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पोद्दार हॉस्पिटल आणि मोफत अस्थिरोग शिबीर हे जणू आता लातूरकरांसाठी एक अद्वितीय समिकरणच बनले आहे. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेले आजचे हे १७४ वे मोफत शिबीर होते. आपण समाजाचेही काही देणे लागतो. ते अशा शिबिराच्या माध्यमातून केलेल्या रुग्णसेवेने साध्य होते, या विचाराने डॉ.अशोक पोद्दार मोफत रुग्णसेवेचा हा यज्ञ चालविण्याचे काम करत असतात.

यावेळी बोलताना पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशनच्या स्थापना दिवसाचे औचित्य साधून आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. पाच सहा दिवस चालणाऱ्या या शिबिराच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. जास्तीत जास्त रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहनही त्यांनी केले.

राहुलकुमार मीना यांनी आपल्या मनोगतात रुग्णांनी या उपक्रमांचा लाभ घेऊन आपले आयुष्य निरोगी जगण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. पोद्दार हॉस्पिटलच्या मोफत अस्थिरोग शिबिराबाबतची ख्याती आपण ऐकून असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. अशोक पोद्दार यांनी आपल्या प्रास्ताविकात हा उपक्रम मागच्या नऊ वर्षांपासून राबविला जात असल्याचे सांगितले. सहा वर्ष बेस्ट उपक्रमाच्या आयोजनाचे पारितोषिकही मिळाल्याचे सांगितले. राज्यातील ३० हुन अधिक जिल्ह्यात अशा प्रकारचे उपक्रम डॉ. पराग संचेती यांच्या अध्यक्षतेखाली राबविण्यात येतात. आपल्या या कार्याची दखल ऑल इंडिया ऑर्थोपेडिक असो.च्या वार्षिक सोहळ्यातही घेतली गेली असून त्याचाही पुरस्कार मिळाला असल्याचे त्यांनी नमूद केले.

पोद्दार हॉस्पिटलच्या या मोफत अस्थिरोग शिबिरात एकूण ६९ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. यामध्ये ५७ रुग्णांची हाडांच्या ठिसूळतेची मोफत तपासणी करण्यात आली.यावेळी २८ रुग्णांचे एक्सरे, १८ रुग्णांची रक्त तपासणी तर ३२ रुग्णांची फिजिओथेरपी करण्यात आली. सर्व रुग्णांना मोफत औषधींचेही वितरण करण्यात आले. डॉ.अशोक पोद्दार, डॉ. इम्रान कुरेशी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. कपिल धुमुरे, डॉ. सिद्रामप्पा भोसगे ,डॉ. प्रशांत अंभोरे यांनी रूग्णांची तपासणी केली.

# श्री राम कथा ज्ञानयज्ञाच्या भव्य मंडपाचे आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** औसा तालुक्यातील किल्लारी येथे दि. २३ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत होणाऱ्या प.पू. राष्ट्रसंत मोरारी बापू यांच्या श्री राम कथा ज्ञान यज्ञाच्या भव्य मंडपाचे श्री निळकंठेश्र्वर सहकारी साखर कारखाना परिसरात भूमिपूजन शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. ही कथा दररोज सकाळी साडेनऊ ते दुपारी दिड या वेळेत होणार आहे. कथेसाठी उपस्थित राहणाऱ्या सर्व भाविक भक्तांसाठी दररोज महाप्रसादाचीही सोय करण्यात आली आहे.



आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते सभा मंडपाचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी लक्ष्मीरमणजी लाहोटी, ओमप्रकाश डागा , बियाणी, किल्लारीच्या सरपंच सुलक्षणा बाबळसुरे, माजी सरपंच डॉ. शंकर परसाळगे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. भूमिपूजन सोहळ्यानंतर श्री राम कथा संयोजन समितीच्या वतीने आ. पवार यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना आ. अभिमन्यू पवार यांनी श्री राम कथेच्या श्रवणासाठी दररोज हजारोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास आपण सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले. श्री राम कथेच्या श्रवणासाठी हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती राहणार आहे. त्याकरिता आवश्यक तो पोलीस बंदोबस्त, आरोग्य सुविधाही उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याची माहिती आ. पवार यांनी दिली. माहेश्र्वरी समाजाच्या लातूर शहराध्यक्षपदी लक्ष्मीकांत सोनी यांची निवड झाल्याबद्दल यावेळी आ. पवार आणि डागा परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ईश्र्वरप्रसाद डागा यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कथेच्या आयोजनामागची पार्श्र्वभूमी विस्तृतपणे विशद केली. याप्रसंगी हुकूमचंदजी कलंत्री, राजेंद्र मालपाणी, दिनेश पपरूनिया, श्याम खटोड, शरद नावंदर, रमेश राठी, रामेश्र्वर सोमाणी, ईश्र्वर बाहेती, गोविंद धूत, श्याम धूत, विजय पस्तापुरे , हरीशभाई ठक्कर, रामबिलास लोया, हरिकिशन मालू, आनंद लाहोटी, बाळूसेठ बिदादा, दर्शन डागा , आकाश डागा, किरण झंवर, श्रीकांत बजाज, श्याम बांगड यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# केवायसीअभावी किती बहिणी नाराज हे लवकरच कळणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** केवायसी न झालेल्या लाडक्या बहिणींना महिन्याला मिळणारे पंधराशे रूपये बंद होणार आहेत. हा आकडा येत्या दोन, तीन दिवसांत समोर येईल. लातूर जिल्ह्यातील ६१ हजार लाडक्या बहिणी केवायसीसाठी पात्र असल्याचे महिला व बाल कल्याण विभागाने जाहीर केले होते.

दरम्यान, मुदतीत अनेक लाडक्या बहिणींची केवायसी न झाल्याने ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली होती. या मुदतीतही केवायसी न झालेल्या लाडक्या बहिणी महिन्याला मिळणाऱ्या पंधराशे रूपयांच्या मानधनापासून वंचित राहतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्र दिनी पोलिसांच्या शिबिरात ७२९ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ३ मे :** महाराष्ट्रदिन व कामगारदिनानिमित्त शुक्रवारी (दि.१) जिल्हा पोलीस, डॉ. भालचंद्र रक्तपेढी व रोटरी क्लब लातूर मिडटाऊनच्या संयुक्त विद्यमाने शहरातील पोलीस अधीक्षक कार्यालयासह पाच पोलीस ठाण्यांमध्ये आयोजित शिबिरात तब्बल ७२९ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यावेळी सहभागी रक्तदात्यांसह नागरिकांना एक हजार हेल्मेटचे वितरण करण्यात आले. ऐन लग्नसराईच्या काळात होणाऱ्या अपघातांमुळे जाणवणाऱ्या रक्ताच्या तुटवड्यावर या शिबिरामुळे रुग्णांना रक्त उपलब्ध होणार आहे.



पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी तांबे यांनी स्वतः रक्तदान करून पोलीस अधिकारी, अंमलदार व नागरिकांना रक्तदान करण्यास प्रोत्साहित केले. यावेळी आयोजित शिबिरांमध्ये पोलीस अधीक्षक कार्यालयातील शिबिरात १६५ जणांनी रक्तदान केले. गांधी चौक पोलीस ठाण्यात १७७, एमआयडीसी पोलीस ठाण्यात १३८, विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात १३२ व लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यातील शिबिरात ११७ अशा एकूण ७२९ जणांनी रेकॉर्डब्रेक रक्तदान केले.

लातूर जिल्हा पोलीस दलाने केवळ कायदा-सुव्यवस्था राखण्यापुरते कार्य न करता सामाजिक जाणीव, मानवी मूल्ये आणि जनहित यांचा संगम घडवून आणत एक आदर्श निर्माण केला आहे. या उपक्रमामुळे पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्र्वास अधिक दृढ झाला आहे. या शिबिरांच्य यशस्वीतेसाठी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे, गांधी चौकचे सुनील रेजितवाड, शिवाजीनगरचे अभिषेक शिंदे, विवेकानंद चौकचे संतोष पाटील, लातून ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहायक पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी वैभव नेटके, यांन विशेष परिश्रम घेतले.

## संक्षिप्त...

### श्रीराम ची कु.श्रीजा यलगटे विज्ञान शाखेतुन मुलीत पहिली



**तभा वृत्तसेवा**

**रेणापुर दि. ३ मे :** येथील श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालयाचा बरावी (एच. एस.सी.) बोर्ड परीक्षेचा निकाल शनिवार दि २ दुपारी रोजी जाहीर झाला. विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के तर कला शाखेचा निकाला ९१.७८% लागला असून श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली त्यात कु. श्रीजा नरसिंग येलगटे ला एकुण ४३४ गुण टक्केवारी७२.३३ %टक्के घेवुन उत्तीर्ण होवुन विज्ञाण शाखेतून मुलीत पहिली तर विद्यालयातुन तिसरा क्रमांक घेवुन घवघवीत यश संपादन केले. विज्ञान शाखेतून गुनाले समर्थ सुधाकर ने ७६.५० % गुण घेवुन पहिला क्रमांक पहिलावला तर कदम हिमांशू हरिनाम याने ७४.१७% घेवुन दुसरा क्रमाक तर तिसऱ्या क्रमांकं वर श्रीजा नरसिंग येलगटे ने ७२.३३% गुण मिळवून मुलीत पहिली येण्याचा मान मिळवला.

कला शाखेतून कु. चव्हाण दिव्य विलास ९४.७% गुण घेवुन पहिली क्रमांकावर तर द्वितीय क्रमांकावर कु.स्नेहा निवृत्ती आकनगीरे, ९०.३३% गुण घेतले तिसऱ्या क्रमांकावर कु.जोगदंड वैष्णवी संतोष ७९.३३% गुण घेवुन यश संपादन केले

सर्व यसस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देवीदास कुटवाड, संस्थेचे सचीव अँड. पंडीतराव उगीले, उपाध्यक्ष रविकांत आकणगिरे, कोषाध्यक्ष ज्ञानोबा बरुरे, सहसचिव विठ्ठल कटके, संचालक ओमप्रकाश गोडभरले, अनिता भातिकिरे, सुधीर बरुरे, दीपक गोडभरले, प्राचार्य अनिल कुटवाड, पर्यवेक्षक भारत धायगुडे, सेवानिवृत माजी प्राचार्य सिद्धेश्र्वर मामडगे, अमृतेश्र्वर स्वामी, लहुकांत शेवाळे, प्रकाश करमुडे यांच्या सह सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### पु.अहिल्यादेवी उच्च माध्यमिकचा ९४.५४% निकाल

**तभा वृत्तसेवा**

अहमदपूर **दि. ३ मे :** तालुक्यातील सांगवी सु येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता बारावी कला व विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९४.५४% लागला असून विज्ञान शाखेचा निकाल ९८% लागला आहे तर कला शाखेचा निकाल ९० % लागलेला आहे.विज्ञान शाखेतून सय्यद नबिस्ता तौसीफ ७३.१७% ही प्रथम तर भुजारे अनुजा महावीर ७२.५०% द्वितीय आणि देमगुंडे ऋतुजा संभाजी ६९.१६ % तृतीय आली.तसेच कला शाखेतून सुरनर दिव्या बिजू ८१.१७% प्रथम,हानवते सुमेध मुनेश्र्वर ७९.८३% द्वितीय आणि नरवटे काजल शिवदास ७६.६७% तृतीय आले.विज्ञान शाखेतून ९९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर कला शाखेचे ६६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष गणेशदादा हाके पाटील, संस्थेच्या सचिव प्राचार्या रेखाताई तरडे हाके,संस्थेच्या उपाध्यक्षा मानसीताई हाके आदींनी अभिनंदन केले.

### छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयाचे १२ वी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. ३ मे : किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी १२ वी बोर्ड २०२६ च्या परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन करत परिसरात अभिमानाची भावना निर्माण केली. विज्ञान,वाणिज्य, कला या तिन्ही शाखेचा एकूण निकाल ९२.८७ टक्के लागला आहे. यामध्ये विज्ञान विभागाचा ९३.१५ टक्के ,वाणिज्य विभागाचा ९२.७५ टक्के, आणि कला विभागाचा ९१.३७ टक्के इतका लागला .जाधव श्रद्धा चंद्रकांत हिने विज्ञान शाखेत ८४.५० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला. कला शाखेत ८१.०५ टक्के गुण घेऊन हारगेवाड दिव्या बसवंत हिने प्रथम क्रमांक मिळवला तर वाणिज्य शाखेतून अट्टर्गेकर दीक्षा हिने ८९.६७ % गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला. संस्कृत विषयात मानसी किशोर थोटे, अनिता राजीव कांबळे या विद्यार्थिनींनी १०० पैकी १०० गुण प्राप्त केले .**

**याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी.टी. शिंदे, सहसचिव हिरागीर सिद्धगीर गिरी, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, कार्यकारिणी सदस्य श्री.ज्ञानदेव झोडगे , श्री.रामराव एकंबेकर , श्री. काकासाहेब पाटील , श्री.भीमराव पाटील,प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे, पर्यवेक्षक प्रा.आर.पी.गिरी व कनिष्ठ, वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.**

# ग्रामपंचायतीच्या इमारतीतून जनतेचे प्रश्न सोडवावे : सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील




**तभा वृत्तसेवा**

**चाकूर दि. ३ मे :** तालुक्यातील भाटसांगवी येथे नव्याने बांधण्यात आलेल्या ३७ लक्ष रुपयाच्या ग्रामपंचायती इमारतीचा व २० लक्ष रुपयाच्या सभागृहाचा लोकार्पण सोहळा सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.या ग्रामपंचायतच्या इमारतीतून सर्वसामान्य जनतेचे प्रश्र्न सोडवावे व ग्रामपंचायत इमारत स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रशासनाने कायम पुढाकार घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी भाटसांगवी तालुका चाकूर येथे केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष भागवत टमके होते. व्यासपीठावर जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, माजी नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे, सभापती प्रतिनिधी मच्छिंद्र नागरगोजे, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, उषाताई कांबळे, उपसभापती भुजंग शिंदे, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य पद्माकर पाटील, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक यशवंत जाधव, अनिल वाडकर, सरपंच जयश्रीताई कवठे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक नंदकुमार पवार, पंचायत समिती सदस्य संतोष कलवले, माजी सरपंचमधुकर मुंडे, सिद्धेश्र्वर अंकलकोटे, सरपंच बनसावरगाव निलेश भंडे, माजी उपसरपंच अब्दुल शेख, दयानंद साठे, बळीराम भोसले, परमेश्र्वर नवगन, राष्ट्रवादी युवक तालुकाध्यक्ष संदीप शेटे धनराज बाचीफळे, केशव सांगवे, देवानंद पाटील, संजय कुंभार ,संग्राम पटणे, तुकाराम साठे ,उद्धव बिराजदार, सचिन तोरे सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री ना . बाबासाहेब पाटील म्हणाले की, भाटसांगवीची ग्रामपंचायत इमारत ही अत्यंत खूप चांगली झाली असून, या इमारतीतून लोकांचे प्रश्र्न आपण सोडवले पाहिजेत. शाळा ,सोसायटी आणि ग्रामपंचायतीचा विकास म्हणजेच खऱ्या अर्थाने गावाचा विकास असून भाटसांगवीच्या विकासासाठी मी कायम प्रयत्नशील असून माझ्यासोबत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे सदस्य सुद्धा या गावच्या विकासासाठी कटिबद्ध असतील अशी सहकार मंत्री यांनी ग्वाही दिली.

शासनाच्या वतीने घराची जनगणना सुरू झाली असून या जनगणनेत या गावासह चाकूर तालुक्यातील सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून घराची जनगणना करून घ्यावी असे आवाहन सुद्धा सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष गणपत कवठे यांनी सादर केले यात त्यांनी ग्रामपंचायतीच्या इमारती विषयी व विविध विकास कामाविषयी त्यांनी आढावा सादर केला. यावेळी दयानंद सुरवसे, मच्छिंद्र नागरगोजे, उषाताई कांबळे, मिलिंद महालिंगे, यांनी समयोचित मनोगत व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बिलाल पठाण यांनी केले.या कार्यक्रमासाठी स्वागत अध्यक्ष गणपत कवठे यांच्यासह अंकुश टमके, गोविंद टमके, हरिभाऊ टमके, अंतेश्र्वर टमके व गावातील इतर विविध पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

## शेतकऱ्यांवरील अन्यायाचा पाढा आता मंत्रालयात वाचला जाणार

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. ३ मे :** लातूर जिल्ह्यासह उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पीकविमा प्रश्र्नाने आता गंभीर वळण घेतले आहे. खरीप हंगाम २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या अतोनात नुकसानानंतरही विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडले नाही. त्यामुळे, निर्माण झालेला संताप आता राज्याच्या मंत्रालयापर्यंत पोहोचला आहे. या संदर्भात राज्याचे माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी एका पत्राद्वारे राज्याचे कृषी मंत्री ना. श्री. दत्तात्रय भरणे यांच्याकडे तातडीच्या बैठकीची मागणी केली होती. त्याला कृषी मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. उदगीर मतदारसंघातील उदगीर व जळकोट तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पीकविमा प्रश्र्नावर तातडीने बैठक बोलावली असून, येत्या १३ मे २०२६ रोजी मुंबईत कृषी मंत्री यांच्या दालनात यावर निर्णायक चर्चा होणार आहे.

**नेमके प्रकरण काय?**

उदगीर-जळकोटचे आमदार संजय बनसोडे यांनी कृषी मंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात मतदारसंघातील शेतकऱ्यांची व्यथा मांडली होती . २०२५ च्या खरीप हंगामात सोयाबीन, तूर, मूग, उडीद आणि कापूस या पिकांचे अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले होते. सरकारने हेक्टरी १७ हजार रुपयांची मदत जाहीर केल्यामुळे शेतकऱ्यांना पीकविम्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, प्रत्यक्षात विमा कंपन्यांनी 'पीक कापणी प्रयोगाचा' आधार घेत शेतकऱ्यांना हात दाखवला होता.

आमदार बनसोडे यांच्या मागणीची दखल घेत कृषी मंत्री कार्यालयाने तातडीने बैठकीची सूचना (NOTICE) जारी केली आहे.

तारीख: १३ मे २०२६

वेळ: सकाळी ११:१५ वाजता

स्थळ: मंत्री महोदयांचे दालन क्र. ३०१, मंत्रालय, मुंबई.

**शेतकऱ्यांच्या नजरा मंत्रालयाकडे..**

मानव सेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद घेऊन शेतकऱ्यांच्या लढ्यासाठी आग्रही असलेल्या आमदार संजय बनसोडे यांनी या बैठकीत ठोस तोडगा काढण्याची विनंती केली आहे. आता १३ मे रोजी होणाऱ्या या बैठकीत विमा कंपन्यांना झुकवून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आमदार संजय बनसोडे आग्रही राहणार आहेत.

## माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाला सुरुवात



**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. ३ मे :** नागरिकांचे आरोग्यमान सुधारण्यासाठी शासनाने ‘ माझं गाव, आरोग्य संपन्न गाव ’ अभियान सुरू केले आहे. या अभियानाची अंमलबजावणी दि.१ मे महाराष्ट्र दिनाच्या दिवशी अतनुरात सुरूवात करण्यात आली आहे.

गावातील प्रत्येक नागरिकाला घराजवळच आरोग्यसेवा देणे, प्रतिबंधात्मक, प्रोत्साहनात्मक आरोग्यसेवा देणे, नागरिकांच्या जीवनशैलीत बदल घडवणे, आरोग्यसेवा केंद्रस्थानी ठेवून, लोकसहभागातून आरोग्य सेवा बळकट करणे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून माझं गाव, आरोग्य संपन्न गाव हे अभियान शासनाने सुरू केले आहे. या अभियानात ग्रामपंचायत केंद्रबिंदू आहे.

याप्रसंगी प्राथमिक आ.केंद्र अतनूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.सकलेन शेख, डॉ.भक्ती कोळळे, आरोग्य सहाय्यिका प्रेमिला म्हेत्रे, आरोग्य सहायक बालाजी सोनटक्के, आरोग्य निरीक्षक शेख सलमान, फार्मसिस्ट गजानन तोंडारे, वरिष्ठ लिपीक रोखपाल पांडूरंग सूर्यवंशी, शासननियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य तथा दलितमित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, आरोग्य मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्थांचे संस्थापक राज्याध्यक्ष बी.जी. शिंदे अतनूरकर, जिजामाता महिला मंडळ अतनूरच्या अध्यक्षा सौ.संध्या बाळासाहेब शिंदे अतनूरकर, वसुंधरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.रुक्मीणबाई पांडुरंग सोमवंशी, ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य व ग्राहक समिती महाराष्ट्र राज्यांचे प्रदेश संघटक बी.जी.शिंदे सर्व आरोग्य पर्यवेक्षिका, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य परिचारिका परिचर, सर्व आरोग्य कर्मचारी वृंद, परिचर ,सर्व गटप्रवर्तक व सर्व आशा कार्यकर्ती उपस्थित होते.

या अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी तालुका समिती स्थापन करण्यात आली आहे. गटविकास अधिकारी या समितीचे अध्यक्ष असून ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधिक्षक, बालविकास प्रकल्प अधिकारी, पाणीपुरवठा, तालुका विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायत पातळीवरदेखील कृती समितीची स्थापना करण्यात येणार आहे.

### म. फुले कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९५ %

**तभा वृत्तसेवा**

अहमदपूर **दि. ३ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचे मार्फत फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत अहमदपूर च्या महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी यश संपादन केले आहे.

या वर्षी चा निकाल , विज्ञान शाखेतून १९१ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्या पैकी १८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.विज्ञान शाखेचा निकाल ९६.३३% इतका लागला आहे. विशेष प्राविण्यासह ०१, प्रथम श्रेणीत १३, द्वितीय श्रेणी १७० असे एकूण १८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विज्ञान शाखेतून - मालू प्रथमेश पवन -७६.१७%, शिंदे संगम शिवानंद-६८.५०% , गायकवाड सुजल विद्यासागर -६७.६७% मिळवले आहेत.

कला शाखेमधून ४६ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी ४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत कला शाखेचा सरासरी निकाल ९१.३० % लागला आहे.

## उदयगिरी महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९४.६३ टक्के

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. ३ मे :** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील फेब्रुवारी २०२६ परीक्षेतील बारावीच्या विविध शाखांच्या निकालामध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले असून एकूण निकाल प्रति वर्षाप्रमाणे उत्कृष्ट ठरला आहे.

महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेने ९५.६३ टक्के निकालाची नोंद केली असून या शाखेत एकूण २७५ विद्यार्थ्यांपैकी २६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ६ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर ३८ विद्यार्थी प्रथम श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

कला शाखेचा निकाल ९६.८७ टक्के इतका उत्कृष्ट लागला असून ३२ पैकी ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये १ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर ८ विद्यार्थी प्रथम श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

वाणिज्य शाखेने ८९.३९ टक्के निकाल मिळवला असून ६६ पैकी ५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ११ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर १२ विद्यार्थी प्रथम श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

एकूण महाविद्यालयाचा निकाल ९४.६३ टक्के लागला आहे. एकूण ३७३ विद्यार्थ्यांपैकी ३५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यापैकी १८ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, तर ५८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या सातत्यपूर्ण परिश्रम, अभ्यासू वृत्ती आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश संपादन केले आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष अॅड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, उपप्राचार्य एस. जी. कोडचे, पर्यवेक्षक प्रा. एस. व्ही. मूडपे, प्रा. टी. एन. सगर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. या निकालामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जोपासली गेली आहे.

## महाराष्ट्र दिनानिमित्त निलंग्यात 100 रक्तदात्यांचे रक्तदान

### स्वराज्य सेवाभावी संस्थेचा २६ वर्षांपासूनचा अखंड उपक्रम



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. ३ मे :** महाराष्ट्र दिनानिमित्त निलंगा येथे वार्षिक परंपरेनुसार स्वराज्य सेवाभावी संस्था व देशमुख हॉस्पिटल च्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते. गेल्या २६ वर्षापासून ची स्वराज्य सेवाभावी संस्थेची अखंड सेवा चालू असून १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त हुतात्मा स्मारक निलंगा येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रथमता संजीव राठोड, प्रदीप जाकोटिया, निळकंठ निटूरकर, सावता चोपणे व सुनील जाधव या पाच रक्तदात्यांनी प्रथमतः रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले. यानंतर दिवसभर चालणाऱ्या या शिबिरात नगराध्यक्ष संजयराज हलगरकर,डॉ. सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ .अरविंद भातंबरे, डॉ .संजय बरूरे,माजी पंचायत समिती सभापती अजित माने, न. प.गट नेते अजित नाईकवाडे , विनोद आर्य,नगरसेवक धम्मप्रकाश निंबाळकर, माजी सभापती शरद पेटकर, सुमित ईनानी, प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण सोळुंके, मराठा सेवा संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष एम एम जाधव,डि.बी.बरमदे, रवी फुलारी, अजित पाटील, प्रल्हाद बाहेती, नगरसेवक प्रा.गजेंद्र तरंगे अदीसह मान्यवरांनी रक्तदान शिबिरास भेट देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी १०० रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला यामध्ये प्रामुख्याने अश्र्विनी निंबाळकर, डॉ. अनिता बरूरे, अश्र्विनी जाधव, सरस्वती शाहीर, मीनाक्षी पांडे, सुरेखा निंबाळकर, नंदिनी गोविंद इंगळे या महिला रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. तर किशोर दूधनकर , युवराज पाटील व विष्णू हलकरे यांनी सहकार्य केले. डॉ.भालचंद्र ब्लड सेंटर चे जनसंपर्क अधिकारी दिगंबर पवार,सुनिल जहागीरदार ,संतोष डाळींबे, श्रीमती गायत्री ईगवे, प्रसाद नावाडे , विकास बन , राजकुमार गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. स्वरराज सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष दत्ता शाहीर व देशमुख हॉस्पिटलचे डॉ. लालासाहेब देशमुख त्यांनी सर्व रक्तदात्यांचे आभार मानले.

## रस्ते व तीर्थक्षेत्र विकासकामासाठी ग्रामविकास मंत्र्याकडे पाठपुरावा



**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. ३ मे :** औसा विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित विकासकामांसाठी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांची आ. अभिमन्यू पवार यांनी भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.या भेटीदरम्यान मतदारसंघातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यामध्ये कारला तांडा, कुमठा तांडा, रामवाडी, शिवणीलख वाडी, हालसी ते हंद्राळ, हत्तरगा, धानोरा-यलमवाडी, औसा ते आलमला, सारोळा ते खुंटेगाव, सारणी पूर्व ते जुने सारणी, भुसणी-धानोरा तसेच मसलगा ते माळकोंडजी या जोडरस्त्यांचा समावेश आहे. या रस्त्यांमुळे नागरिकांना वाहतुकीस मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले.

रस्त्यांची कामे ‘पुरहानी’ कार्यक्रम व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना निधी अंतर्गत प्रस्तावित असून प्राधान्याने मंजूर करण्याचे आश्र्वासन मंत्री गोरे यांनी दिले.तसेच औसा मतदारसंघातील मौजे फत्तेपूरसह विविध गावांमध्ये नवीन इमारतींच्या बांधकामासाठी मंजुरी देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. याचबरोबर देवताळा येथील देवी मंदिर, महादेववाडी येथील महादेव मंदिर, मातोळा येथील खंडोबा मंदिर तसेच इतर ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्रांना ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन आवश्यक सुविधा व निधी उपलब्ध करून देण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले.

या संदर्भात ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्रासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याची माहिती मिळाली आहे.

## विवेकशील जीवन हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया : भंते महाविरो थेरो



**तभा वृत्तसेवा**

अहमदपूर **दि. ३ मे :** जगातील संपूर्ण प्राण्याचा एक स्वभाव आहे.आहार, निद्रा,भय,मैथून पण तथागत बुद्धांनी मनुष्याला याच्यापुढे जाऊन या चार गोष्टीत गुरफटून न राहता विवेकशील राहून सर्व तृष्णेचा त्याग करायला शिकवतात व जीवन प्रज्ञामय आणि विवेकशील असावे यावर भर देतात. त्यामुळे मनुष्याचा खऱ्या अर्थाने सामाजिक व वैश्र्विक उद्धार होऊ शकतो असे प्रतिपादन पूज्य भंते महाविरो थेरो यांनी केले.

तालूक्यातील मौजै काळेगाव येथील तक्षशिला बुद्ध विहार येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षे बुद्ध पौर्णिमेनिमित्त धम्म प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात प्रवचन देताना ते बोलत होते.

सकाळच्या सत्रात युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या हस्ते धम्मध्वजारोहन संपन्न झाले. त्यानंतर उपस्थित भिक्खू संघास भोजन दान देण्यात आले.

दुपारच्या सत्रात मान्यवरांचा सत्कार व धम्मदेसना कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे,जेष्ठ नेते दिलीपराववजी देशमुख,नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले,मंत्रालयातील अधिकारी रत्नाकर खिल्लारे,समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड,आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळेस प्रत्येक पौर्णिमेचा दायक यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तर ग्रामविकास अधिकारी म्हणून सेवा निवृत्त झालेले राजेंद्र कांबळे यांचा सपत्नीक तर गोपीनाथराव जोंधळे,उत्तम कांबळे यांचा संयोजन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवक नेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रा.डी.बी.शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष गायकवाड,डॉ.बालाजी थिट्टे,बजरंग गायकवाड, विठ्ठल कांबळे,नितीन सरकाळे,प्रभाष कसादे, सचिन बानाटे आदी धम्ममसेवकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी तक्षशिला बूध्द विहार येथे दिवसभर हजारों बौध्द उपासक उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## काक्रंबा गावच्या मुस्कान शेखची पोलिस दलात निवड



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.३ मे -**

तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा येथील मुस्कान रऊफ शेख हिने कष्ट व जिद्दीच्या जोरावर नवी मुंबई पोलिस दलात महिला पोलिस म्हणून निवड मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

तिच्या या यशाबद्दल काक्रंबा येथील शिवसैनिकांच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी दिलीप बंडगर, दयानंद वाघमारे, चेतन बंडगर, शाम सुरवसे, दिपक भिसे, कार्तिक वाघमारे, बालाजी गोडसे, साईनाथ झाडे, वासुदेव भालेराव, पप्पू झाडे, नामदेव झाडे आदी उपस्थित होते. मुस्कान शेख हिच्या यशामुळे परिसरातील मुलींना प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



## संक्षिप्त वृत्त...



### एमबीबीएस पदवी मिळवल्याबद्दल डॉ. स्वप्निल पाटील यांचा सत्कार

**लोहारा, दि.३ मे -**

येथील उद्योगपती भगवान पाटील यांचे सुपुत्र डॉ. स्वप्निल सविता भगवान पाटील यांनी लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस पदवी संपादन केली. यानिमित्त मिलाप मित्र मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. आम्लेश्वर गारठे, जगदिश लांडगे, आयुब शेख, इकबाल मुल्ला, संजय दरेकर, ज्ञानेश्वर जाधव, जब्बार मुल्ला, दादाभाई मुल्ला, खाशिम मुल्ला, आदम मुल्ला, जलाल मुल्ला, आहिल मुल्ला, आप्पासाहेब देवकर आदी उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### ‘लोकसंवाद पदयात्रा’चा कळंब येथे समारोप

**कळंब, दि.३ मे -**


जल, जंगल आणि जमीन जनता यांच्या आधीन या घोषणेसह अंबेजोगाई व कळंब तालुक्यातील सुमारे २० गावांतून आयोजित ‘लोकसंवाद पदयात्रा’चा समारोप १ मे रोजी कळंब येथे करण्यात आला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कस्तुरबा गांधी, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त २७ एप्रिल ते १ मे दरम्यान ही पदयात्रा पार पडली. शहरात आगमनानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे यात्रेचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर विविध मार्गाने पदयात्रा बालोद्यान येथील डॉ. आंबेडकर पुतळ्याला अभिवादन करून शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात समारोप कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.बी.बी. गिरी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोकराव मोहेकर उपस्थित होते. यावेळी डॉ. सोमनाथ रोडे, शिवाजी खोगरे, माधव बावगे, के.ई. हरिदास, प्रा. अर्जुन जाधव यांनी पदयात्रेतील अनुभव कथन करत ग्रामीण भागात नवचैतन्य निर्माण करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा. वर्षा सरवदे यांनी केले.



### बन्सी डोके यांचा सोंन्नेवाडी ग्रामपंचायतीकडून सत्कार

**भूम, दि.३ मे -**

भारतीय मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष बन्सी डोके यांना ‘मराठा समाज भूषण’ पुरस्कार मिळाल्याबद्दल सोंन्नेवाडी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सतीश सोंन्रे, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे, सुनील भोईटे, शिवाजी जालन, तानाजी जालन, हनुमंत जालन, अशोक खरवडे, राहुल सोंन्रे, राजकुमार सोंन्रे, विकास सोंन्रे, सतीश नरसु सोंन्रे, महादेव माने आदी उपस्थित होते.



### डोकेवाडी शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**भूम, दि.३ मे -**

तालुक्यातील डोकेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळा पूर्वतयारी कार्यक्रमांतर्गत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करून इयत्ता पहिलीत प्रवेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी होते, तर पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे व महावीर जालन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी १५ विद्यार्थ्यांना पहिलीत प्रवेश देण्यात आला. विद्यार्थ्यांचे औक्षण, पायाचे ठसे घेणे व पेढा भरवून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात पालकांसोबत संवाद साधून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सहभाग वाढवण्यावर भर देण्यात आला. मुख्याध्यापक संजय क्षीरसागर, शिक्षकवर्ग तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सोमनाथ तौर यांनी, तर आभार रुपाली गवळी यांनी मानले.

## कळंबमध्ये ट्रान्सफॉर्मरला भीषण आग; ५० लाखांचे नुकसान

### नागरिकांच्या मदतीने आगीवर नियंत्रण...





**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३ मे -**

कळंब शहरातील महावितरणच्या ५ केव्ही मेन पॉवर ट्रान्सफॉर्मरला उष्णतेमुळे भीषण आग लागून मोठे नुकसान झाल्याची घटना शनिवारी (दि. २ मे) दुपारी घडली.

या आगीत सुमारे ५० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, आग लागल्यानंतर बराच वेळ महावितरणचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी न पोहोचल्याने नागरिकांत संताप व्यक्त करण्यात आला. कळंब शहरातील सबस्टेशनमधून शहरासह ग्रामीण भागाला वीजपुरवठा केला जातो.

याच ठिकाणी आढाळा फिडर आणि कळंब शहर फिडरवर मोठ्या प्रमाणात विद्युत भार असून, वाढत्या उष्णतेमुळे दुपारी सुमारे २:१७ वाजता ट्रान्सफॉर्मरला आग लागली. आग लागल्यानंतर नगराध्यक्ष सुनंदा कापसे यांनी तात्काळ नगरपालिकेची अग्निशामक यंत्रणा पाठवली. तसेच इम्रान मुल्ला यांनी दयावान प्रतिष्ठानच्या टँकरसह केज येथूनही पाण्याची व्यवस्था केली. मात्र ट्रान्सफॉर्मरमधील ऑइलमुळे पाणी टाकल्यानंतर आग अधिक भडकत असल्याने आग विझवणे अवघड झाले. दरम्यान, आग एकदा आटोक्यात आल्यानंतर पुन्हा भडकली आणि जवळपास तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतरच ती पूर्णपणे नियंत्रणात आणण्यात यश आले. या काळात महावितरणचे वरिष्ठ अधिकारी उशिरा पोहोचल्याने स्थानिक कर्मचारी आणि नागरिकांनाच परिस्थिती हाताळावी लागली. आग विझवण्याच्या कामात आ. कैलास पाटील, कृ.उ.बा.स. संचालक विलास पाटील, उपजिल्हाधिकारी शिंदे, अग्निशामक दलाचे संजय काळे तसेच अमृता फायर व राम राज्य प्रतिष्ठानच्या सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच अथर्व क्षिरसागर, समर्थ राजमाने, अमित पाटील, पार्थ भिसे, पवन वेदपाठक, कुणाल जोशी, प्रसन्न हुलसुरकर, केदार खराडे, सचिन गाडे, श्लोकराज कवडे, शिवम शेंडगे, संकेत आवटे, अभिषेक आवटे आणि ओंकार चिपाडे यांनीही बचावकार्यामध्ये मोलाचे सहकार्य केले.

या घटनेमुळे शहरातील वीजपुरवठा यंत्रणेतील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या असून, ट्रान्सफॉर्मरची देखभाल व सुरक्षिततेबाबत महावितरण प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

## नसरापूर घटनेतील आरोपीस फाशीची मागणी; मुख्यमंत्र्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ मे -**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे चार वर्षीय बालिकेवर अत्याचार करून हत्या केल्याच्या घटनेचा तीव्र निषेध करत आरोपीस तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी पेशवा युवा संघटना व नळदुर्ग शहर ब्राह्मण समाज संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवून कठोर शिक्षा द्यावी, जेणेकरून अशा घटनांना आळा बसेल, असे निवेदनाद्वारे नमूद करण्यात आले.

या घटनेमुळे राज्यभर संतापाची लाट उसळली असून नागरिकांकडून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

पोलिस ठाण्यामार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे निवेदन पाठविण्यात आले.

यावेळी तालुकाध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, अध्यक्ष मुकुंद नाईक, नगरसेवक आकाश कुलकर्णी, सचिव संदीप वैद्य, उपाध्यक्ष प्रदीप ग्रामोपाध्ये, उमेश नाईक, सनी भुमकर, गजानन कुलकर्णी, मयूर भुमकर, नितीन कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## ‘माझं गाव आरोग्य संपन्न गाव’ अभियानाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**

आरोग्य हीच खरी संपत्ती असून निरोगी समाज घडविणे हीच प्रगतीची दिशा आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात आरोग्य संस्थांचे ऑनलाईन लोकार्पण व ‘माझं गाव आरोग्य संपन्न गाव’ अभियान कार्यशाळेच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते.

यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना पाटील, आमदार कैलास पाटील घाडगे, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आदी उपस्थित होते.

लोहारा तालुक्यातील माकणी व कानेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांसह विविध उपकेंद्रांचे लोकार्पण करण्यात आले. या सुविधांमुळे माता-बाल आरोग्य, लसीकरण व प्राथमिक उपचार अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचणार आहेत.

‘माझं गाव आरोग्य संपन्न गाव’ अभियानांतर्गत संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण, लवकर निदान, गर्भवतींची काळजी, बालकांचे लसीकरण आणि कुपोषण निर्मूलनावर भर दिला जाणार आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्राम पंचायतींना पुरस्कार देण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

कार्यक्रमात अर्चना पाटील यांनी अभियानात सर्व गावांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी केले.

## ‘१०८ नवे उद्योजक’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद; ६७० अर्जांची छाननी सुरू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**

जिल्ह्यातील आर्थिक विकासाला चालना देत युवक-युवतींना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पक्षाने राबविलेल्या ‘१०८ नवे उद्योजक’ या उपक्रमाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत तब्बल ६७० इच्छुकांनी अर्ज सादर केले असून, या अर्जांची छाननी प्रक्रिया सध्या सुरू आहे. मोठ्या प्रमाणावर अर्ज प्राप्त झाल्याने छाननीसाठी आणखी सात ते आठ दिवसांचा अवधी लागणार असून, १ मे रोजी होणारी निवड प्रक्रिया आठवडाभर पुढे ढकलण्यात आली आहे.

या उपक्रमामागील प्रमुख उद्दिष्ट म्हणजे जिल्ह्यातील युवकांनी केवळ नोकरीच्या शोधात न राहता ‘नोकरी देणारे उद्योजक’ बनावे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाद्वारे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

निवड झालेल्या १०८ उद्योजकांना सर्वांगीण मदत दिली जाणार असून, त्यात उद्योगासाठी आवश्यक परवाने मिळवून देणे, तांत्रिकदृष्ट्या सक्षम प्रकल्प अहवाल तयार करणे, बँकांकडून कर्जपुरवठा मिळवून देणे, तसेच शासकीय अनुदानासाठी मार्गदर्शन आदी बाबींचा समावेश असेल. प्राप्त अर्जांची संख्या अपेक्षेपेक्षा अधिक असल्याने मोठे आव्हान उभे राहिले आहे. पारंपरिक उद्योगांपेक्षा नाविन्यपूर्ण आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संकल्पनांना प्राधान्य दिले जाणार आहे. अंतिम निवडीनंतर निवड झालेल्या उद्योजकांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या महत्वाकांक्षी उपक्रमामुळे जिल्ह्यात नवीन उद्योगांची उभारणी होऊन हजारो कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, तसेच धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## धर्मांतर थांबवण्यासाठी हिंदूंनी संघटित होण्याची गरज : हर्षाताई ठाकूर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**

सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित हिंदू जागृती मेळावा नुकताच पार पडला. या कार्यक्रमात विविध वक्त्यांनी सामाजिक जागरूकता, संस्कार आणि एकात्मतेवर भर देण्याचे आवाहन केले

मेळाव्यात प्रमुख वक्त्या हर्षाताई ठाकूर यांनी समाजाने शिक्षण, संस्कार आणि संघटन यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी युवक-युवतींनी इतिहासाची जाण ठेवून समाजातील सकारात्मक बदलासाठी पुढे यावे, असे सांगितले. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते राजेश अंबादास संन्यासी, हभप ज्ञानेश्वर माऊली महाराज एकंबीकर आदींची उपस्थिती होती. त्यांनी कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, सामाजिक समरसता आणि नागरी कर्तव्य यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी महापुरुषांचा इतिहास, संस्कारमूल्ये आणि सामाजिक ऐक्य जपण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विविध समाजघटकांनी एकत्र येऊन सकारात्मक परिवर्तन घडवावे, असे आवाहन वक्त्यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन जय भवानी हिंदू संमेलन समितीच्या वतीने करण्यात आले होते.

## प्रतिकूल परिस्थितीतही भैरवनाथ विद्यालयाचा गुणवत्तेचा ठसा कायम : डॉ. शोभा मिसाळ

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३ मे -**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही भैरवनाथ अध्यापक विद्यालयाने आपल्या गुणवत्तेचा व उपक्रमशीलतेचा उच्च दर्जा कायम राखला आहे, असे प्रतिपादन धाराशिव जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. शोभा मिसाळ यांनी केले. त्या विद्यालयाच्या वार्षिक तपासणी भेटीदरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधत होत्या.

या प्रसंगी व्यासपीठावर अधिव्याख्याते प्रा. प्रदीप घुले, प्रा. उमेश नरवडे, प्रा. मिलिंद आघोर तसेच विद्यालयाचे प्राचार्य सतीश मातने उपस्थित होते. डॉ. मिसाळ पुढे म्हणाल्या, भैरवनाथ अध्यापक विद्यालय हे गुणवत्तेच्या आणि उपक्रमांच्या बाबतीत उत्कृष्ट असल्याचे पूर्वी ऐकले होते.



मात्र आज प्रत्यक्ष भेटीत भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांची शिस्तबद्धता, उपस्थिती आणि कार्यरत कर्मचारी वर्ग पाहून समाधान वाटले. कठीण काळातही संस्थेचे सुयोग्य व्यवस्थापन कसे करावे, याचा आदर्श या विद्यालयाने घालून दिला आहे, असे त्या म्हणाल्या. या कार्यक्रमात सीटीईटी व टीईटी परीक्षेत यश मिळवलेल्या स्नेहल खोडसे व प्रीती महाद्वार या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सतीश मातने यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीकांत पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. श्रीकांत पवार, प्रा. मोहिनी शिंदे, प्रा.यू.एन. पवार, प्रा. सुदर्शनी कांबळे, राजकुमार शिंदे, आदित्य गायकवाड, विनोद कसबे यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## उमरगा बसस्थानकात सोन्याचे दागिने चोरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ मे -**

येथील बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने महिलेच्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे.या प्रकरणी सुजाता जामगे (वय ३५, रा. तुगाव, ता. उमरगा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दि.२९ एप्रिल रोजी त्या उमरगा ते सोलापूर एसटी बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पर्समधील सुमारे १५ ग्रॅम वजनाचे अंदाजे ६० हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेले.

## २.१२ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.३ मे -** मोटार वाहन कायदा उल्लंघन प्रकरणी एकूण २३२ कारवाया करण्यात आल्या. यावेळी सुमारे २ लाख १२ हजार रुपयांचा तडजोड शुल्क वसूल करण्यात आला.

## मलकापुर येथे शेताचे नुकसान; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.३ मे -**

कळंब तालुक्यातील मलकापुर येथे शेतात टँकर घालून नुकसान केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी अक्षयकुमार लोमटे (वय ३३, रा. मलकापुर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राजेश गणेश लोमटे (रा. मलकापुर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. दि. २ मे रोजी शेतात पाण्याचा टँकर नेऊ नका असे सांगितल्याने आरोपीने जबरदस्तीने टँकर शेतातून फिरवून अंदाजे ३० हजार रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप आहे. तसेच फिर्यादीस शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

## नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्यावर बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक कोंडी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ मे -**

नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्यावर बेशिस्त वाहन चालकांमुळे दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः सकाळी आठ ते अकरा या वेळेत या रस्त्यावर परिस्थिती अधिकच गंभीर बनत आहे.

नळदुर्ग बसस्थानकाच्या बाजूने जाणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावर दुचाकी चालकांकडून रस्त्याच्या मध्यभागापर्यंत मोटारसायकली उभ्या केल्या जात आहेत. रस्ता दोन पदरी असतानाही अशा अव्यवस्थित पार्किंगमुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हा प्रकार सुरू असून संबंधित विभाग व पोलिस प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी नागरिकांतून व्यक्त होत आहे. परिणामी बेशिस्त वाहन चालकांची मनमानी वाढत चालली आहे. या रस्त्यावर अस्ताव्यस्त उभ्या केलेल्या मोटारसायकलींमुळे पादचाऱ्यांना चालणेही अवघड होत आहे. तसेच एखाद्या वाहनाचा धक्का लागल्यास तात्काळ वाद निर्माण होऊन भांडणाचे प्रसंग घडत आहेत. वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन चालकांवर पोलिसांनी तातडीने कडक कारवाई करून रस्ता मोकळा व सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.